# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. १४ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : २९/०७/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**२९/०७/२०१९** शनिवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवानराव मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवानराव मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | कोल्हे प्रविण रामदास |
| ढेकळे सदाशिव गणपत | सनकत चेतन गणेश |
| बेंडाळे उज्वला मोहन | कापसे मयुर चंद्रकांत |
| **ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह** | पाटील प्रतिभा सुधिर |
| **पोकळे दिलीप बबनराव** | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| खडके सुनिल वामनराव | भंगाळे विष्णू रामदास |
| **बरडे नितीन मनोहर** | **बागवान रियाज अहमद अब्दुल करीम** |

सदर सभेस, मा.आयुक्त, श्री.उदय टेकाळे, मा.उपायुक्त. श्री. उत्कर्ष गुटे, मा.उपायुक्त. श्री. मिनानाथ दंडवते, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव:- जळगांव शहर महानगरपालिकेत शासनाकडुन दोन उपायुक्त नविन आलेले आहेत एक उपायुक्त आहे श्री.दंडवते साहेब व दुसरे आहेत श्री.गुटे साहेब यांचे स्वागत आहे .**

**नगरसचिव:- विषय क्र. १)** दि.०६/०७/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.भगत बालाणी :-** सदर कार्यवृत्त कायम करणेपुर्वी माझी सुचना आहे की , ठराव क्रं. १३६ सभा क्रं.१२ दि.०६/०७/२०१९ जादा विषय क्र.०१, निविदेतील अर्हतापुर्ण करणाऱ्या संस्थांचे देकार मागवुन जास्तीत जास्त स्वमित्वधन(Royalty) देणाऱ्या संस्थेची निवड करणेत यावी. महानगरपालिकेने अटींची पुर्तता करणाऱ्या संस्थेची निवड करणेत यावी. या रॉयल्टीमध्ये दरवर्षी ५% नैसर्गिक वाढ अपेक्षित राहील. असा आपण ठराव केलेला होता. यात मी पुढील प्रमाणे दुरुस्ती सुचवत आहे. निविदेमध्ये नमुद केलेल्या अर्हतेनुसार जी संस्था /ट्रस्ट / अशासकीय सेवाभावी संस्था जास्तीत जास्त गुणांनी पात्र ठरेल अशा नियुक्त केलेल्या संस्थेस स्वमित्वधन (Royalty) रक्कम रु.१,२५,०००/- प्रतिवर्ष या अटीने देण्यात यावे. अशी सुचना करत आहे. सदर नियुक्ती संस्थेने मनपा यास रक्कम रु.१,२५,०००/- प्रतिवर्ष व त्यामध्ये दरवर्षी ५% वाढीने स्वमित्वधन (Royalty) सेवा प्रदान करणेचे काम सुरु केल्यापासुन वर्षाअखेरीस देणेचे आहे. अशी सुचना करीत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही , नाही ..... मुळ ठरावामध्ये काही तांत्रिक दुरुस्त्या असतील तर समजु शकतो, मुळ ठराव झालेला असेल त्या मुळ ठरावामध्ये लिहतांना काही तांत्रीक चुक झालेली असेल किंवा क्लरीकल मिस्टेक झाली असेल तर तश्या पध्दतीने दुरुस्ती सुचवता येवु शकते . परंतु ठराव एक घेतलेला असेल आणि त्याचे स्वरुपच बदलायचे असेल तर मला वाटतं पुन्हा नव्याने स्वतंत्र प्रस्ताव मांडणे योग्य राहील.

**श्री.भगत बालाणी :-** जसे आपल्याला हे सेवाभावी संस्थांना द्यायचे आहे आणि गोरगरीबांसाठी आपण हे करतोय याच्या पुर्वी केलेला जो ठराव आहे त्या अनुषगांने जर केले की आपली हॉस्पीटल सुविधा सिव्हिल हॉस्पीटल सेवेवर अवलंबुन राहणार नाही. जसे आज सिव्हील हॉस्पीटल सुरु आहे. सिव्हिल हॉस्पीटल मध्ये रूग्ण जातो व तेथे तुमच्यावर उपचार होत नाही आपला उद्येश्य काय आहे की गोरगरीबांना माफक दरामध्ये सुविधा उपलब्ध व्हायला पाहीजे अश्यामुळे आपल्या हातुन सेवा घडेल असा मनपाचा हेतू आहे. सदर हेतुमुळे आपण दुरूस्ती केली नाही तर आपला तो हेतू बाजुला राहुन जाईल असे माझे म्हणणे आहे. आपल्याला आपले मनपाचे हॉस्पीटल ला सिव्हिल हॉस्पीटल करायचे नाहीये .

**श्री.नितीन लढढा :-** प्रश्न तो नाहीये, माझा प्रश्न हा आहे की इतिवृत्त अंतिम करीत असतांना झालेल्या ठरावामध्ये काही ग्रामीटीकल मिस्टीक झाल्या असतील किंवा काही शब्द सुटलेले असतील.

**श्री.भगत बालाणी :-** साहेब यांचा विरोध नोंदवुन घ्या. शहरातील सेवा देण्याचा प्रयत्न आहे .

**श्री.नितीन लढढा :-** तुम्ही समजुन घेत नाहीयेत.

**श्री.भगत बालाणी :-** आम्ही समजलो.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती साहेब विषय काय आहे जो काही प्रस्ताव म्हणजे सुचना ज्या भगत भाऊंनी सुचविल्या आहेत तसा प्रस्ताव नविन पध्दतीचा पुढील बैठकीत ठेवा.

**श्री.सुनिल खडके :-** भाऊ ती फक्त दुरूस्ती आहे.

**श्री.भगत बालाणी :-** साहेब यांचा विरोध नोंदवा.

**श्री.नितीन लढढा :-** कायदेशीर रित्या ठेवु शकतात. या ठिकाणी इतिवृत्त मंजुर करतांना त्यामध्ये तांत्रिक कारणाने काही त्रुटी असतील तर त्या दुरूस्त करता येणे ही बाब समजु शकतो परंतु ठरावाचे जर कधी मुळच बदलवित असतील तर ते मंजुर करीत असतांना ते नियमबाहय ठरेल व त्याची अमलबजावणी होणार नाही किंवा कायदेशीर रित्या शब्द सुटलेले असतील त्या मान्य करण्याच्या दृष्टीकोणातुन नविन प्रस्ताव मिटींग मध्ये घ्या. ज्या काही सुचना तुम्हाला ठरावामध्ये द्यायचे असतील त्या पध्दतीने ठराव होऊ शकतो. तुमचं उद्दीष्ट वाईट आहे असे मला म्हणायचे नाही. परंतु कुठेतरी बेकायदेशीर कृत्य योग्य नाही. पायंडा पाडु नये.

**श्री.भगत बालाणी :-** ते कायद्यात बसतं की नाही ते मा.आयुक्त साहेब ठरवतील.

**श्री.नितीन लढढा :-** ठिक आहे. प्रशासनाने कायदेशिर रित्या ठरावावर चर्चा करावी. अशा प्रकारे चुकीचे पायंडे पाडण्यात येवु नये. अशी नोंद कार्यवृत्तात घेण्यात यावी.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** सभापती साहेब तुम्ही ज्यांना परवानगी दिली त्यांनीच बोलायचे आहे अश्या प्रकारे बोलुन सभा चालविणे योग्य नाही. तुम्ही बोलण्या आधी परवानगी घ्या.

**नगरसचिव :-** आपले काय मत आहे ?

**श्री.नितीन लढढा :-** आमचा विरोध आहे.

**नगरसचिव :-** सन्मा .सदस्य श्री.बागवान सो ?

**श्री.रियाज बागवान :-** मी तटस्थ आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, स्थायी समिती ठराव क्र.१३६ सभा क्र.१२ जादा विषय क्रमांक ०१ दि.०६/०७/२०१९ अन्वये सदर विषयास मंजूरी देताना “निविदेतील अर्हतापुर्ण करणाऱ्या संस्थांचे देकार उघडुन जास्तीत जास्त स्वामित्वधन (Royalty) देणाऱ्या संस्थेची निवड करणेत यावी. महानगरपालिकेने अटींची पुर्तता करणाऱ्या संस्थेची निवड करणेत यावी. या रॉयल्टीमध्ये दरवर्षी ५% नैसर्गिक वाढ अपेक्षित राहील. ” असे नमूद केले असुन त्याऐवजी कार्यवृत्तात “निविदेमध्ये नमूद केलेल्या अर्हतेनुसार जी संस्था / ट्रस्ट/ अशासकीय सेवाभावी संस्था जास्तीत जास्त गुणांनी पात्र ठरेल अशा नियुक्त केलेल्या संस्थेस स्वामित्वधन (Royalty) रक्कम १ लाख २५ हजार प्रतिवर्ष या अटीने देण्यात यावे. सदर नियुक्ती संस्थेने मनपा यांस रक्कम रु.१ लाख २५ हजार प्रतिवर्ष व त्यामध्ये दरवर्षी ५% वाढीने स्वामित्वधन (Royalty) सेवा प्रदान करणेचे काम सुरु केल्यापासुन वर्षाअखेरीस देणेचे आहे.” अशी दुरुस्ती करुन दि.०६/०७/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त दुरूस्तीसह कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ११ प्रतिकुल मते :- ०३ तटस्थ :- ०१**

**सुचक :- बालाणी भगत रावलमल**

**अनुमोदक :-कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** अक्वा व माऊली उद्योगसमुह करीता शहरात वॉटर एटीएम बसविण्यास दि.०१/०७/२०१९ ते ३०/०९/२०१९ या कालावधी करीता ४ ठिकाणी मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सौ.उज्वला बेंडाळे** :-माऊली उद्योग समुह कडुन जे विषय आलेला आहे हा समाजसेवेचा विषय आहे, त्यामुळे हे जे ३-३ महिन्यासाठी किंवा ४-४ महिन्यासाठी मुदतवाढ दिली जाते, ११ महिन्यांची वाढ करून तसा करारनामा करण्यात यावा. जेणेकरुन त्यांना सोईस्कर जाईल आणि ते पैसे दर वेळेला नियमीत भरत आहे म्हणुन ११ महिन्याची तरतुद करुन वाढुन घ्यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, संचालक माऊली अक्वा व माऊली महीला उदयोग समूह यांचे तर्फे प्रगती अशोक पाटील यांनी ना नफा ना तोटा बेसवर वॉटर एटीएम ची यापुर्वी देण्यांत आलेली परवानगी वाढवुन मिळणे बाबत दि.२९/०५/२०१९ रोजी मुदत वाढ मिळणे बाबत अर्ज दिलेला आहे.

जळगांव शहरात वॉटर एटीएम बसविण्यांची परवानगी मागितलेली असुन शहरात एक नाविन्य पुर्ण सामाजिक उपक्रम म्हणुन ना नफा ना तोटा या अनुषंगाने एक जलसेवा म्हणुन अत्यंत कमी दरात फिल्टर असलेले थंडपाणी वाटारु लोकांना या उपक्रमात मिळेल असे अर्जात नमुद केलेले आहे. तरी त्यांना शहरात फुले मार्केट, दाणाबाजार, गोलाणी मार्केट, नेहरु चौक, नवे व जुने बसस्थानक इ.ठिकाणी वॉटर एटीएम बसविण्याची परवानगी मागितलेली आहे परवानगी देण्यापुर्वी अतिक्रमणास व रहदारीस अडथळा होणार नाही तसेच पोलिस विभागाची ना हरकत प्रमाणपत्र आणले नंतर वरील ठिकाणी ४ बाय ६ या पाणी वाटपास एक टेबल लावणेस मान्यता देण्यात यावी.

अर्जदार यांना तत्कालीन आयुक्त यांचे मान्यतेने पत्र क्र./१४५/किववि/दि.२२/०२/२०१९ अन्वये शहरात ६ जागेवर एटीएम व्दारे शुध्द व थंडपाणी योग्य ती फी भरुन परवानगी देण्यात आली होती. अर्जदार यांनी वरील अर्जात शहरातील यापुर्वी देण्यांत आलेल्या ४ ठिकाणी वॉटर एटीएमची मुदतवाढ मिळणे बाबत मागणी केलेली असल्याने अर्जदार यांचेकडून नियमाप्रमाणे निश्चित केलेली फी वसुल करुन दि.०१/०७/२०१९ पासून ११ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात अटी शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बालाणी भगत रावलमल**

**अनुमोदक :-ढेकळे सदाशिव गणपतराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** म.न.पा. १७ मजली प्रशासकीय इमारतीतील जुनी सर्व सहा उद्‌वाहके निष्कासीत करुन त्या जागी नवीन सहा उद्‌वाहके बसविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**ॲड .शुचिता हाडा :-** ह्या ज्या कंपनीला आपण टेंडर देत आहोत, या मध्ये दर्शविण्यात आलेल्या कंपनीचे जळगांव शहरात कुठेही कार्यालय नाही, जळगांव जिल्हयात कुठेही ह्या कंपनी शासकीय निम शासकीय कार्यालयात सेवा दिलेली नाही, या बद्दलची माहिती मला सांगा बरोबर आहे की नाही.

**श्री.सुशिल सांळुखे :-** जळगांव शहरात त्यांचे कार्यालय नाही, पण त्यांनी आश्वासित केलेले आहे की, येथे ही ६ लिफ्ट बसविले नंतर येथे नेटवर्क स्टॅबलीश करु जळगांव जिल्हा कव्हर करणार आहे. आणि दुसरी गोष्ट जळगांव जिल्ह्यात एक ही नाही परंतु म्हाडा सगळया गर्व्हमेटच्या संस्था आहे तेथे त्यांनी बसविलेले आहे.

**ॲड .शुचिता हाडा :-** माझे म्हणणे असे आहे की, येथे ज्या कंपनीचे ऑफिस नाही, दुसरी गोष्ट जळगांव जिल्ह्याला त्यांच्या सेवेचा अनुभव नाही. लिफ्ट हा अतिश्य संवेदनशिल विषय आहे. म्हणजेच नागरीकांच्या जिवाशी खेळ होणार आहे, लिफ्ट मध्ये काही प्रॉबलेम आला, काही अपघात झाला, तर ते लोकांच्या जिवाशी खेळणे आहे, तर या बद्दल आपण टेक्निकल स्पेसिफिकेशन तपासणे खुप आवश्यक आहे. हे आश्वासन आहे फक्त, आश्वासनाची पुर्तता होणार का ? या बद्दल गॅरंटी आजच्या तारखेत आपण कोणीच देऊ शकत नाही. त्यानंतर दुसरा मुद्दा असा आहे, १३.०२% कमीने त्यांनी टेंडर घेतलेले आहे. त्यावेळेला ते कोणत्या दर्ज्याची सेवा देणार कंपनी आणि याच्यात जर काही प्रॉबलम आला तर याला जबाबदार कोण राहणार, हा प्रशासनाचा प्रस्ताव आहे म्हणुन मी याची जबाबदारी प्रशासनावरच टाकु इच्छिते की प्रशासनाने आधी ते सर्व टेक्निकल स्पेसिफीकेशन तपासावे या सगळया जबाबदारींचा संपुर्ण अभ्यास करावा कारण हा अतिशय संवेदनशिल विषय आहे. लोकांच्या जिवाशी खेळ होणार आहे याच्यात जर काही अडचण आली तर. या कंपनीला कार्यादेश दिल्यानंतर जर या कंपनीकडुन सेवा पुरविली गेली नाही कारण यांचा आज येथे एक ही कार्यालय नाही. त्याच्यामुळे काही जे किरकोळ अडचणी असतात त्यासाठी यांचा माणुस मुंबईहुन कधी येणार, आपण त्यांना कळवायचे केव्हा आपली तक्रार तो माणुस कधी घेणार. त्यानंतर ती अडचण कधी सोडविली जाणार. हा अतिशय संवेदनशिल विषय आहे त्यामुळे याचा निर्णय अतिशय जबाबदारींने होणे गरजेचे आहे. जर भविष्यात यात काही ही अडचणी आल्यात तर ही प्रशासनाचीच जबाबदारी राहील.

**मा.आयुक्त :-** ह्या लिफ्टच्या संदर्भात जे काही पॅरामिटर्स होते ते संपुर्ण तांत्रिक बाबी तपासुनच ह्या निविदा ओपन केलेल्या आहे आणि ज्यावेळेला ठराविक कंपन्यांची ऑफिस येथे नाही. असे म्हणुन जर आपण विचार केला तर बहुतेक मोठया कंपन्याचे ऑफिस येथे नसणार. ज्या वेळेला कंपन्याची डिसीशन अट असेल त्यावेळेला आपण बघु. ज्यावेळेला हिजी तांत्रीक बाब आहे संपुर्णपणे कृटीणी करणाऱ्याची जबाबदारी राहील आणि एग्रिमेंट मध्ये तशी स्पष्ट तरतुद आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, म.न.पा.१७ मजली प्रशासकीय इमारत मधील सर्व सहा उद्वाहके सन १९९९-२००० साली अर्थात सुमारे १९ ते २० वर्षापुर्वी बसविण्यात आले असुन उद्वाहनाची उभारणी करण्यात आल्यापासुन सतत वापर झाल्यामुळे उद्वाहनांचे काही भाग जिर्ण झालेले असल्याने जुनी सर्व उद्वाहकांचे अत्याधुनिक प्रकारचे तंत्र वापरुन परिवर्तन करण्याबाबत मा.विदयुत निरीक्षक, सचिव, अनुज्ञपक मंडळ व उद्वाहन निरीक्षक, चेंबुर,मुंबई यांनी दि.३/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये निर्देशित केलेले आहे.

त्या अनुषंगाने ओटीस इलेव्हेटर व कायनॅटीक हुंडाई इलेव्हेटर अण्ड मुव्हमेंट टेक्नॉलॉजीस लि.पुणे या प्रचलीत व कार्यरत उत्पादक कंपन्यांकडून उद्वाहकांचे परिवर्तन / अत्याधुनिकीकरण करणे कामी दर मागवुन धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यात आला असता, प्रशासकीय इमारतीतील सर्व उद्वाहक नवीन बसविल्यास त्याचा एकुण खर्च किती येईल? या संबंधात माहिती घेवुन त्या अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव पुढील महासभेपुढे ठेवण्याबाबत महासभा ठराव क्र.६७९/दि.२०/०६/२०१७ अन्वये निर्देश देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने व तत्कालीन आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार सदर प्रचलीत / कार्यरत ओटीस व कायनॅटीक हुंडाई इलेव्हेटर अण्ड मुव्हमेंट टेक्नॉलॉजीस लि.पुणे या पद्वाहकांचे कंपन्यांसह इतर सर्व देशी व विदेशी कंपन्यांकडून जुनी उद्वाहके निष्कासीत करुन नवीन उद्वाहके बसविणे कामी दर / प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार सदर उद्वाहकांचे अत्याधुनिकीकरणाचे काम करावे किंवा जुनी उद्वाहके निष्कासीत करुन त्या जागी नवीन उद्वाहके बसवावेत याबाबत अनुक्रमे रु.१,५६,७४,३०४/- व रु.१,८२,७२,३००/- (Civil Work, कॅफोल्डींग व उद्वहन अनुज्ञाप्ती इ.शुल्क चा खर्च वगळून) च्या खर्चासह धोरण निश्चित होणे कामी प्रस्ताव महासभेकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर महासभेत विचारविनिमय होवुन अस्तित्वातील उद्वाहके अत्याधुनिकीकरण करणे व नविन उद्वाहके बसविणे कामी येणारा खर्च पाहता फार मोठया प्रमाणावर फरक नसल्याने जुनी उद्वाहके अत्याधुनिकीकरण न करता नविन उद्वाहके बसविणे कामी ई-निविदा काढुन कार्यवाही करणेस व सदरहु खर्च मुलभुत सुविधा विकास कामांसाठी राज्य शासनाकडुन मिळालेल्या २५ कोटीच्या रक्कमेतुन करणे कामी मा.महासभा ठराव क्र.८८६ दि.२३/०३/२०१८ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्या अनुषंगाने सदर कामी बाजारातील विविध उद्वाहकांच्या कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या दरपत्रके / कोटेशननुसार तयार करण्यात आलेल्या एकुण रु.२,२४,२९,०८६/- चे अंदाजपत्रकास दि.१९/०४/२०१८ रोजीचे शहर अभियंता यांचे मान्यतेने तांत्रिक मान्यता प्राप्त (पत्र क्र.TS/Elect/०३ दि.१९/०४/२०१८ अन्वये) प्राप्त झाली आहे. तद्नंतर सदरचे अंदाजपत्रकास महासभा ठराव क्र./११/दि.१०/१०/२०१८ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनाकडे प्रशासकीय मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केला असता शासनाकडून मिळालेल्या २५ कोटी अनुदानातुन म.न.पा.चे इतर कामांसह म.न.पा.१७ मजली प्रशासकीय इमारत मधील जुनी सर्व ६ उद्वाहके निष्कासीत करुन त्या जागी नविन ६ उद्वाहके बसविणे रु.२,२४,२९,०८६/- चे अंदाजपत्रकास महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास या योजनेतंर्गत शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र./१७१/(२६)/नवि-१६-मंत्रालय मुंबई/ दि.८ फेब्रुवारी २०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर कामी ई निविदा प्रसिध्द करुन दर मागविणेस आयुक्त यांचे दि.१२/०२/२०१९ रोजीचे मान्यतेने ई निविदा क्र.१२९६ (पहिल्यांदा) दि.२/०३/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर प्रकरणी ई-निविदेस कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने (एकही निविदा प्राप्त न झाल्याने) आयुक्त यांचे दि.१८/०४/२०१९ रोजीचे मान्यतेने पहिली फेर ई-निविदा दि.३०/०४/२०१९ रोजी ई-निविदा क्र.१३३९ दुसऱ्यांदा दि.३०/०४/२०१९ रोजी म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

परंतु, सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२/ दि.२७/०९/२०१८ मधील परिच्छेद क्र.४.३ मधील तरतुदी अन्वये प्राप्त दोन्ही निविदाकारांचे म.न.पा.संकेत स्थळावरील फोल्डर क्र.१ व २ उघडण्यात आले.

दोन्ही निविदाकारांचे प्राप्त निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता निविदाकार एस्के इलेव्हेटर मुंबई यांचे अंदाजित रक्कमेवर १३.०२% कमीचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमीचे असुन त्यानुसार सदर कामी एकुण १,९५,०८,८१९/- खर्च अपेक्षित आहे. निविदाकार यांचे निविदेतील प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १०% पेक्षा अधिक दराने कमी असल्याने दि.२७/०९/२०१८ रोजीचे वर नमुद शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४.६.१ मधील तरतुदी अन्वये संबंधित कंत्राटदाराकडून एवढया कमी दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तर तपशिल मागविण्यात आला असता, लघुत्तम निविदाकार एस्के इलेव्हेटर मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र.ESKAY/T/JMC/1021/Dt.११/०७/२०१९ अन्वये सदरचे काम अंदाजित एक्कमेपेक्षा १३.०२% एवढया कमीच्या दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तर तपशिल त्यांचे पत्रातील बाब क्र.१ ते ९ व्दारा म.न.पा.कडे सादर

केलेला आहे. त्यात त्यांनी त्यांचे कंपनीचे व्यवस्थापन समितीने विचारविनिमय करुन सदर निविदेत पॅकेज किंमत म्हणून तसेच जळगांव म.न.पा.चे सदर प्रतिष्ठीत प्रकल्पाशी संबंधित / निगडीत राहण्यासाठी कंपनीने नफ्याचे प्रमाण मोठया प्रमाणावर कमी करुन दर कमी केलेले असल्याचे नमुद केलेले असुन सन १९९४ पासुन पालघर जिल्हातील वाडा येथे त्यांचे या संबंधिता कारखाना असुन ते उद्वाहकांचे मुळ उपकरणांचे उत्पादक असल्याची पुष्टी दिलेली आहे. तसेच निविदेतील बायबॅक ऑफर, कंपनीची स्वत:ची दळणवळणाची व्यवस्था व सदर प्रकल्पाकरीता लागणारे साहित्य त्यांचेकडे हजर स्टॉकमध्ये उपलब्ध असल्याने देखील निविदेतील दर कमी दिल्याचे नमुद केलेले आहे. सदर प्रकल्पाच्या वापरण्यात येणाऱ्या सामुग्रीची गुणवत्ता, स्थापना कामगिरीची गुणवत्ता, ई-निविदेत दिलेल्या मानांकनानुसार व लागु असलेल्या भारतीय मानांकनानुसारच राहील. याबाबत पुष्टी देवुन त्यांनी आश्वासीत केलेले आहे. तसेच त्यांना कार्यादेश दिल्यानंतर निविदेत दिलेल्या दरात व निर्धारित कालावधीत प्रकल्प पुर्ण करुन देण्याची ग्वाही दिलेली आहे. एकुणच त्यांचे पत्रातील बाब क्र.१, २, ५, ६, ७, व ८ मधील नमुद बाबींव्दारे निविदेत १३.०२% कमीचे दर दिल्याचे कारण नमुद केलेले आहे. एकुणच त्यांना, सदरचे काम निम्नतम देकाराच्या किंमतीत पुर्ण करता येण्याची त्यांनी खात्री दिलेली आहे. सदर तपशिल पाहता मक्तेदारास, सदरचे काम निम्नतम देकाराच्या किंमतीत पुर्ण करता येणे शक्य असल्याची खात्री वाटण्यास हरकत नसावी.

तरी त्या अनुषंगाने लघुत्तम मक्तेदार एस्के इलेव्हेटर मुंबई यांचे अंदाजित रक्कमेपेक्षा १३.०२% टक्के कमीचे दर स्विकृत करणेस हरकत नसल्याने त्यानुसार सदर कामी एकुण रक्कम रु.१,९५,०८,८१९/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात येत असुन मक्तेदाराकडून सदर कामी म.न.पा.
अटी शर्तीचा करारनामा सोबतच लघुत्तम मक्तेदाराचे दर १०% पेक्षा अधिक दराने कमी असल्याने (अर्थात अंदाजित रक्कमेपेक्षा १३.०२% कमी चे असल्याने) वर नमुद दि.२७/०९/२०१८ चे शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.४.६.३ मध्ये नमुद तरतुदीनुसार परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणुन एकुण ५% (निविदा रक्कमेच्या) रक्कमेची (१३.०२% कमीचे दराकरीता) कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेची DD/FDR/BG स्वरुपात मक्तेदाराकडून हमी घेणे आवश्यक व क्रमप्राप्त राहील.

सदर कामी लघुत्तम निविदाकार एस्के इलेव्हेटर मुंबई यांचे अंदाजित रक्मेपेक्षा १३.०२% ने कमीचे दर स्विकृत करण्यास व त्यानुसार एकुण रक्कम रु.१,९५,०८,८१९/- मात्र चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- बालाणी भगत रावलमल**
**अनुमोदक :-बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०१/०४/२०१९ ते दि.०७/०४/२०१९, दि.०८/०४/२०१९ ते दि.१४/०४/२०१९, दि.१५/०४/२०१९ ते दि.२१/०४/२०१९ व दि.२२/०४/२०१९ ते दि.२८/०४/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०१/०४/२०१९ ते दि.०७/०४/२०१९, दि.०८/०४/२०१९ ते दि.१४/०४/२०१९, दि.१५/०४/२०१९ ते दि.२१/०४/२०१९ व दि.२२/०४/२०१९ ते दि.२८/०४/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- बालाणी भगत रावलमल**
**अनुमोदक :-कापसे मयुर चंद्रकांत**

**जादा विषय क्र.०१ :- जळगांव शहर महानगरपालिका महासभा ठराव क्र.२० दि.११/१०/२०१८ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.जिल्हा न्यायालयात महानगरपालिकेची बाजु प्रभाविपणे मांडणे कामी नविन वकील पॅनल निर्माण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४७ पारित करण्यात आला.**

**असा ठराव करणेत येत आहे की**, जळगांव शहर महानगरपालिका मा.महासभा ठराव क्र.२० दि.११/१०/२०१८ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्चन्यायालय, मा.जिल्हा न्यायालयात महानगरपालिकेची बाजु प्रभावीपणे मांडणेकामी नविन वकिल पॅनल निर्माण करणेबाबत ठराव पारित करण्यात आलेला होता. त्याअनुषंगाने नविन वकिल पॅनलवर नियुक्ती करणे कामी इच्छुक वकिलांमार्फत अर्ज मागविणेसाठी दि.१३/०२/२०१९ रोजी दै.दिव्यमराठी या वृत्तपत्रामध्ये जाहिरात देण्यात आलेली होती.

त्यानुसार मे.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली, मे. उच्चन्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ मे.उच्चन्यायालय मुंबई, मुंबई खंडपीठ, मे.जिल्हा व सत्र न्यायालय, मे.कामगार न्यायालय, मे.औदयोगीक न्यायालय, ग्राहकमंच जळगाव करीता एकुण ७१ वकीलांचे अर्ज विधीशाखेस प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिका विधी पॅनलवर खालील विधीतज्ञांची नियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| ना.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली | | |
| १ | अड.सुहास कदम | दिल्ली |
| २ | अड.प्रशांत एस.कैंजाळे | दिल्ली |
| ३ | अड.शिवाजी जाधव | दिल्ली |
| ना.उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद | | |
| १ | अड.सुशीलकुमार हेमंतकुमार त्रिपाठी | औरंगाबाद |
| २ | अड.विजय बी.पाटील | औरंगाबाद |
| ३ | अड.संदेश आर.पाटील | औरंगाबाद |
| ४ | अड.सचिन बाळासाहेब मुंडे | औरंगाबाद |
| ५ | अड.व्ही.डी.गुनाले | औरंगाबाद |
| ६ | अड.लक्ष्मण विष्णु संगीत | औरंगाबाद |
| ७ | अड.मेहुल नावंदर | औरंगाबाद |
| मा.जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव | | |
| १ | अड.आनंद एस.मुजुमदार | प्रमुख विधी सल्लागार |
| २ | अड.गजेंद्र यशवंतराव पाटील | जळगांव |
| ३ | अड.विक्रम उत्तम देवराज | जळगांव |
| ४ | अड.सुरेंद्र जी.काबरा | जळगांव |
| ५ | अड.छाया आर.सपके | जळगांव |
| ६ | अड.धिरज अशोक पाटील | जळगांव |
| ७ | अड.दिपकराज सोपान खडके | जळगांव |
| ८ | अड.व्ही.एम.पाटील | जळगांव |
| ९ | अड.जयंत तुळशीदास कुरकुरे | जळगांव |
| १० | अड.सतिश रघुनाथ चव्हाण | जळगांव |
| ११ | अड.महेश रघुनाथ भोकरीकर | जळगांव |
| १२ | अड.तुळशीराम पंडित नेमाडे | जळगांव |
| १३ | अड.दर्शन बी.देशमुख | जळगांव |
| १४ | अड.स्वप्निल विजयसिंग पाटील | जळगांव |
| १५ | अड.टी.आर.पाटील | जळगांव |
| १६ | अड.ज्योती सुनील भोळे | जळगांव |
| १७ | अड.सुनील रघुनाथ बागुल | जळगांव |
| १८ | अड.अमित एस.सोनवणे | जळगांव |

| | | |
|---|---|---|
| १९ | अड.प्रदीप शांताराम सोपारकर | जळगांव |
| २० | अड.मिलिंद पंढरीनाथ बडगुजर | जळगांव |
| २१ | अड.वसंत समाधान भोलाणकर | जळगांव |
| २२ | अड.केतन जयदेव ढाके | जळगांव |
| २३ | अड.रणजितसिंग के.पाटील | जळगांव |
| २४ | अड.सुभाष रामदास तायडे | जळगांव |
| २५ | अड.दिलीपकुमार भगवानदास मंडोरे | जळगांव |
| २६ | अड.रमाकांत सोनवणे | जळगांव |
| २७ | अड.विलास मानसिंग पाटील | जळगांव |
| २८ | अड.अनिल सूर्याजी पाटील | जळगांव |
| २९ | अड.राजेंद्र काशिनाथ पन्हाळे | जळगांव |
| ३० | अड.आनंदा रामकृष्ण सरोदे | जळगांव |
| ३१ | अड.सारंग कुलकर्णी | जळगांव |
| ३२ | अड.जयंत भाऊराव मोरे | जळगांव |
| ३३ | अड.विजय एस.शिंदे | जळगांव |
| ३४ | अड.अशोक जगन्नाथ महाजन | जळगांव |
| ३५ | अड.स्वप्नील एस.कुलकर्णी | जळगांव |
| ३६ | अड.नरेंद्र पुंजु पाटील | जळगांव |

उपरोक्त यादीतील अनुक्रमांक १ ते ३ यांची मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली साठी विधी सल्लागार पॅनलवर, अनुक्रमांक १ ते ७ यांची मा.उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद साठी विधी सल्लागार पॅनलवर तसेच मा.जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव साठी अनुक्रमांक १ यांची प्रमुख विधी सल्लागार पदी व अनुक्रमांक २ ते ३६ यांची मा.जिल्हा व सत्र न्यायालयासाठी विधी सल्लागार म्हणुन विधी पॅनलवर नियुक्ती करणेस व त्यांना अदा करण्यात येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार नियमाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बालाणी भगत रावलमल**

**अनुमोदक :-ढेकळे सदाशिव गणपतराव**

**श्री.भगत बालाणी :-** या यादीत काही नांव वाढवायचे आहे. यादी सादर करतो.

**ॲड .शुचिता हाडा :-** याच्यात एक सुचना अशी द्यायची आहे मला की वकील पॅनल आता आपण नेमत आहे. तर त्यांचा फि स्ट्रक्चर सुध्दा ठरवायला हवे. मागे काही केसेस मध्ये असे झालेले आहे. कारण वकील फी या वरुन वाद झालेले आहेत भविष्यात असे वाद टाळण्यासाठी फी स्ट्रक्चर ठरवुन घ्यावे.

**मा.आयुक्त :-** यासंबंधी काय आहे हायकोर्टाचा तर काही संबंध नाहीये जे स्थानिक आहेत त्यांना आपण सांगु शकतो की हे स्ट्रक्चर आहे त्याच्या शी जे संबंधीत येतील तर आपण त्यांचे करून घेवु .

**नगरसचिव :-** सदरचा विषय सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** होय पहिला एक विषय सोडुन बाकी विषय सर्वानुमते मंजुर आहेत.

**नगरसचिव :-** कार्यवृत्ताचा एक विषय सोडुन बाकी सर्व विषय सर्वानुमते मंजुर आहेत का ?

**श्री.विष्णू भंगाळे :-** होय.

**श्री.भगत बालाणी :-** त्यांनी आधीच सांगीतलेले आहे मग विचारू नका .

**नगरसचिव :-** नाही तसे नाही विचारावे लागते .

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय मला काही बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** आपण बैठक संपल्यानंतर चर्चा करू. राष्ट्रगीत झाल्यानंतर चर्चा करू.

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय तुम्ही हे पाहत नाही की तुमची पध्दत बदलते आहे.

**मा.सभापती :-** मी कुठल्याही मिटींगला असे बोललो का ?

**श्री.विष्णू भंगाळे :-** नाही नाही आम्ही जळगांव शहराच्या विषयी विषय मांडतोय तुम्ही मांडु देत नसाल तर हे चुकीचे आहे. आम्ही याचा निषेध करतो .ही पध्दत नाहीये .

**श्री.नितीन लढढा :-** हि काही पध्दत नाहीये .

**मा.सभापती :-** नगरसचिव राष्ट्रगीतास सुरूवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, राष्ट्रगीतासाठी सर्वांनी उभे राहावे.

राष्ट्रगीता नंतर येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**